रस्ते व पुलांच्या परिरक्षण व दुरुस्तीची कामे करण्याबाबत नवीन मार्गदर्शक सूचनां

महाराष्ट्र शासन,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०११/प्र.क्र.४६७/रस्ते-१
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २१/११/२०११.

वाचा- १) शासन निर्णय क्र.सीएटी-१०८७/सीआर-९४/इमारत-२, दि.१४/६/१९८९
२) शासन पत्र क्र.आरएमआर २००२/प्र.क्र.१०१/रस्ते-१, दि.४.६.२००२.
३) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-१०९७/सीआर-६२२/इमारती-२, दि.२२/८/२००५
४) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २००७/प्र.क्र.२१९/रस्ते-१, दि.९/१०/२००७.

**परिपत्रक :**

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रस्ते व पूलांच्या परिरक्षण व दुरुस्तीच्या कामांना मंजूरी प्रदान करणे व कामे करण्याबाबत शासनाच्या दिनांक ४.६.२००२ रोजीच्या पत्राद्वारे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. या सूचनांमधील तपशीलाप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत विविध स्तरावर रस्ते व पूलांच्या परिरक्षणाच्या कामांचा कार्यक्रम मंजूर करुन कामे हाती घेऊन पूर्ण करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच शासनाच्या दिनांक १४/६/१९८९ रोजीच्या शासन निर्णयान्वये कामांच्या दोषनिवारण दायित्वाच्या कालावधीबाबत मार्गदर्शक सूचनां निर्गमित करण्यात आल्या आहेत. दिनांक २२/८/२००५ रोजीच्या परिपत्रकाद्वारे कामांच्या मोजमापांची तपासणी करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत व दिनांक ९/१०/२००७ रोजीच्या परिपत्रकान्वये रस्त्यांवरील खड्ड्यांची दुरुस्ती करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

रस्ते दुरुस्ती व परिरक्षणाची कामे योग्य रितीने होत नसल्याचे विधीमंडळाच्या कामकाजाच्या दरम्यान व शासनस्तरावर प्राप्त होणाऱ्या लोकप्रतिनिधी व जनतेच्या निवेदनांवरुन शासनाच्या निदर्शनास आले आहे. या परिपत्रकातील सूचनांमध्ये कामांच्या दर्जामध्ये व गुणवत्तेमध्ये वाढ होऊन कामे योग्यरित्या नियोजनबध्द रितीने पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून काही बदल करणे आवश्यक होते. रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी असलेल्या गट- ब, क, ड व ई प्रकारच्या कामांसाठी उपलब्ध होणारे अनुदान गट-अ मधील कामांसाठी वळवून खर्च करण्याची प्रवृत्ती निदर्शनास आलेली आहे. विविध प्रादेशिक विभागांच्या आढावा बैठकीमध्ये सदर बाब प्रामुख्याने सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या नजरेस आणली आहे. या प्रवृत्तीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडवून रस्ते सुस्थितीत राहण्याच्या दृष्टीकोनातून कामे चांगल्या गुणवत्तेंची, आर्थिक निकषांचे

पालन करुन व विहित. कालमर्यादेत पूर्ण करण्याची खबरदारी घेण्याच्या सूचनांही निर्गमित करण्यात आल्या आहेत.

यापुढे शासन कामकाजात सुसुत्रता येणे व कामे चांगल्या दर्जाची होण्याच्या दृष्टीकोनातून यापुढे उपरोक्त शासन परिपत्रकातील सूचनांमध्ये काही बदल करण्यात येत आहेत. तसेच काही बाबी पुन्हा सर्वांना अवगत करण्याच्या दृष्टीकोनातून खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) शासनाने शासन पत्र क्र.आरएमआर-२००२/प्र.क्र.१०१/रस्ते-१, दिनांक ४.६.२००२ अन्वये रस्ते व पूलांच्या परिरक्षण व दुरुस्तीसंदर्भात मार्गदर्शक सूचनां निर्गमित केल्या आहेत. या सूचनांमध्ये बाब क्र.२ मधील २.१ अन्वये गट-अ मधील कामांचा कार्यक्रम अधीक्षक अभियंता स्तरावर मंजूर करण्यात यावा अशा सूचनां निर्गमित केल्या आहेत. यामध्ये आता बदल करण्यात येत असून अधीक्षक .अभियंता यांच्याकडे असलेले अ गटातील कामांचे कार्यक्रम मंजूर करण्याचे अधिकार यापुढे कार्यकारी अभियंता यांना देण्यात येत आहे. कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तुत कार्यक्रम मंजूर करतांना शासनाच्या दिनांक ४.६.२००२ रोजीच्या पत्रातील इतर सर्व सूचनांचे पालन करणे अत्यावश्यक राहील.

महाराष्ट्र राज्यामध्ये अ गटातील कामांचे दायित्व मोठ्या प्रमाणात शिल्लक असल्याचे सर्व प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंता यांच्याकडे प्राप्त झालेल्या अहवालावरुन दिसून येते. सदर बाब गंभीर असून यामुळे कंत्राटदारांना देयके मिळण्यास अनिश्चित विलंब होत आहे. तसेच क्षेत्रिय स्तरावरील अधिकाऱ्यांकडून चालू वर्षासाठी उपलब्ध होणारा निधी जून्या दायित्वाच्या कामांसाठी खर्च केल्याने नवीन कामांना निधी उपलब्ध होत नसल्याने रस्त्याची दुरुस्ती करता येणे शक्य होत नाही. यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीकोनातून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१-अ) अ गटामधील दायित्वाच्या कामांची सर्व देयके मुख्य अभियंता यांनी अन्य मंडळातील कार्यकारी अभियंता/उप अभियंता यांच्यांकडून तपासणी करुन घ्यावीत. या तपासणीनंतर मुख्य अभियंता यांनी अ गटातील दायित्वाच्या कामाचे देयक देण्याबाबत संबंधीत अधिक्षक अभियंता यांना परवानगी प्रदान करावी. मुख्य अभियंता यांच्या परवानगीनंतरच दायित्वाच्या कामांची देयके अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधीत अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल.

१-ब) चालू वर्षामध्ये खड्डे भरण्याची करण्यात येणा-या कामांची रॅंडम पध्दतीने तपासणी मुख्य अभियंता यांनी प्रादेशिक विभागातील अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ यांच्यामार्फत करुन घ्यावी.

१-क) अधीक्षक अभियंता यांनी दायित्वाच्या कामांचा कार्यक्रम मुख्य अभियंता यांचेकडून मंजूर करुन घ्यावा. तसेच प्रत्येक महिन्यास या कामांच्या प्रगतीबाबतचा व देयके अदा करण्याच्या प्रगतीबाबतचा अहवाल प्रादेशिक कार्यालयास सादर करावा.

१-ड) कामांसाठी वापरण्यात येणा-या डांबराच्या खरेदीबाबतच्या चलनाची मूळ प्रत देयकासोबत सादर करणे आवश्यक राहील. सदर चलन संबंधित रिफायनरी यांनीच दिले असल्याबाबत खातरजमा कार्यकारी अभियंता यांनी बिलाचे देयक अदा करण्यापूर्वी करावी. याबाबतचे प्रमाणपत्र बिलासोबत अभिलेख म्हणून ठेवावे.

१-ई) कांही अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाल्यास गट ब,क,ड व इ या गटातील कामांसाठी उपलब्ध असणारे अनुदान गट अ मधील कामांसाठी खर्च करणे आवश्यक असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव सविस्तर कारणमिमांसेसह अधिक्षक अभियंता यांनी मुख्य अभियंता यांच्यामार्फत शासनाकडे मंजूरीसाठी सादर करावा. शासनाची या प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाल्याशिवाय या प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये.

२) शासनाने दिनांक २२/८/२००५ रोजीच्या परिपत्रकान्वये रु.१.०० लक्ष पेक्षा जास्त रक्कमेच्या कामांच्या देयकांमध्ये कार्यकारी अभियंता यांनी ५ टक्के इतक्या रक्कमेची मोजमापे तपासावी अशा सूचनां दिल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येते. परंतु अ गटातील खड्डे भरण्याच्या कामांच्या बाबत या सूचनांव्यतिरिक्त खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचनां देण्यात येत आहे.

अ गटातील सर्व किंमतीच्या कामांची मोजमापे कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/ सहाय्यक अभियंता श्रेणी-२ यांनी मोजमाप पुस्तकात नोंदविल्यानंतर या मोजमापांची १०० टक्के तपासणी उप अभियंता/उप विभागीय अधिकारी/सहाय्यक अभियंता श्रेणी-१ यांनी करणे अनिवार्य राहील. यामध्ये खड्ड्यांच्या पृष्ठभागाचे क्षेत्र व खोली या दोन्हीची तपासणी या अधिकाऱ्यांनी करावी. कार्यकारी अभियंता यांनी खड्ड्यांच्या पृष्ठभागाच्या क्षेत्राची मोजमापे १०० टक्के तपासणे आवश्यक आहे. या तपासणीबाबतच्या नोंदी मोजमाप पुस्तकात करण्यात याव्यात. व तपासणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र देयकासोबत अभिलेख म्हणून ठेवण्यात यावे.

३) शासनाने दिनांक १४/६/१९८९ रोजीच्या परिपत्रकान्वये इमारती, रस्ते व पूल यांच्या विविध कामातील दोषांच्या दुरुस्तीसाठी दोषनिवारण दायित्वाच्या कालावधीबाबत मार्गदर्शक सूचनां निर्गमित केल्या आहेत. या सूचनांप्रमाणे रस्ते परिरक्षण व दुरुस्ती देखभालीच्या कामांसाठी दोषनिवारण दायित्वाचा कालावधी ६ महिने इतका राहील अशा सूचनां आहेत. यामध्ये आता बदल करण्यात येत

असून यापुढे या कामांसाठी दोषनिवारण दायित्वाचा कालावधी २ वर्षे इतका राहील. यापुढे कामांच्या निविदेमध्ये या बाबीचा समावेश करुन कामे करण्यात यावीत.

४) शासनाच्या परिपत्रक क्र.संकिर्ण २००७/प्र.क्र.२१९/रस्ते-१, दिनांक ९.१०.२००७ अन्वये रस्त्यांवरील खड्ड्यांची दुरुस्ती करण्याबाबत मार्गदर्शक सूचनां निर्गमित करण्यात आल्या आहेत. या परिपत्रकातील सूचनांचे पालन क्षेत्रिय कर्मचाऱ्यांनी कसोशीने करावे. यासंदर्भात खालील सूचनांप्रमाणे कामे करतांना काळजी घेण्यात यावी.

४-अ) रस्त्यांवरील खड्डे भरण्यापूर्वी, खड्डे भरण्याचे काम चालू असतांना तसेच काम पूर्ण झाल्यावर प्रत्येक टप्प्याची छायाचित्रे काढण्यात यावीत. ही छायाचित्रे विभागीय कार्यालय / मंडळ कार्यालय व प्रादेशिक कार्यालयात असलेल्या संगणकामध्ये लोड करुन अभिलेख म्हणून जतन करावती. कामांच्या देयकासोबत याच्या प्रती सादर करण्यात याव्यात.

४-ब) खड्डे भरण्यापूर्वी खड्डे चौकोनी / आयाती आकाराचे करण्यात यावे. खड्ड्यांच्या बाजू सरळ पध्दतीत चिझलचा वापर करुन कापाव्यात.

४-क) ५० मी.मी. ते १०० मी.मी. किंवा त्यापेक्षा खोल खड्डे ग्राऊटिंगने भरावे. ५० मी.मी. पर्यंतच्या खोलीचे खड्डे प्रिमिक्स कारपेटने भरण्यात यावेत. खड्डे भरल्यानंतर त्यांची दबाई रोलरद्वारे करण्यात यावी व सदरचे पॅचवर्क अस्तित्वातील रस्त्याच्या पृष्ठभागाच्या समपातळीत असावे.

४-ड) टॅककोट साठी तसेच प्रिमिक्सींगसाठी ८०/१०० ग्रेडचे डांबर वापरण्यात यावे.

४-इ) काही रस्त्यांचे बाजू पट्टया रस्त्याच्या पृष्ठभागाच्या वरील पातळीवर आल्या असल्यास त्या रस्त्याच्या पृष्ठभागाच्या समपातळीवर आणण्यासाठी सांईड शोल्डर्स तासण्याचे काम यंत्रसामुग्री वापरुन करण्यास हरकत नाही. यंत्रसामुग्री शक्यतो पाटबंधारे विभागाकडून उपलब्ध करुन घ्यावी. ज्या ठिकाणी अशी सोय होणे शक्य नसेल तेथे यंत्रसामुग्री अधीक्षक अभियंता यांत्रिक मंडळ, जलसंपदा विभाग यांच्या दरसूचीतील दरांप्रमाणे भाड्याने घेण्याबाबत कार्यवाही विहित नियमांचे पालन करुन करण्यात यावी.

४-य) खड्डे भरल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी खड्डे पडल्यास त्यास संबंधीत क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांना जबाबदार धरण्यात येईल. आवश्यकता वाटल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

४-र) गट अ मधील रस्ते दुरुस्तीची कामे शक्यतो खात्याकडे उपलब्ध असलेल्या मजुरांमार्फत करण्यात यावीत. सद्यःस्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांकडे उपलब्ध मजुरांची संख्या अत्यंत कमी आहे

त्यामुळे ज्या ठिकाणी मजूर उपलब्ध नसतील त्या ठिकाणी ही कामे कंत्राटी पध्दतीने विहीत नियमांचे पालन करुन करण्यात यावीत.

यापुढे उपरोक्त सूचनांचे पालन कामे करतांना करण्यात यावे. या सूचनांचे पालन न करणाऱ्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांविरुध्द उचित प्रशासकीय/दंडनीय कार्यवाही करण्यात येईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक असा आहे
20111226111705125001.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावानुसार.

(हिमांशू श्रीमाळ)
उप सचिव (रस्ते)

प्रत,
महालेखापाल-१, मुंबई/महालेखापाल-२, नागपूर.
सचिव (रस्ते) हयांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, सार्वजनिक बांधकाम विभाग
सचिव (बांधकामे) हयांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, सार्वजनिक बांधकाम विभाग
सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय
प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी-
सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग
सर्व उपसचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
अधिक्षक अभियंता, दक्षता पथक (भरारी पथक), मंडळ, मुंबई.
सर्व अधिक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग
सर्व अधिक्षक अभियंते, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ
सर्व कार्यकारी अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग
सर्व अधिकारी/कार्यासन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग
कार्यासन रस्ते-१ (निवडनस्ती)